सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, कराड.
विद्यानगर, ता. कराड जि. सातारा.
फोन नं (02164)271462 फोन नं. (02164)271635 (P)
email :gpkarad.dte@gmail.com Web: www.gpk.ac.in

जा.क्र. शातंक/विवि/शिष्यवृत्ती/२०२४-२५/ 2346 दिनांक: 14 NOV 2024

**महत्वाची सूचना :**

**विषय–: अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विदयार्थ्यांचे सन 2018–19 ते 2023–24 या कालावधीमधील शिष्यवृत्ती/फ्रीशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली कढण्याबाबत...**

**संदर्भ–: मा. सहायक आयुक्त समाजकल्याण सातारा यांचे पत्र क्र. सआसकसा/भासशि/अन्वेषण /24–25/5722 दिनांक. 29/10/2024**

उपरोक्त विषयासंदर्भान्वये महाविदयालयातील प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व विदयार्थ्यांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष सन 2018–19 ते 2023–24 या कालावधीमध्ये ज्या अनुसूचित प्रवर्गातील विदयार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टल व्दारे ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती/फ्रीशीप करीताचे अर्ज काही तांत्रिक अडचणीमुळे (1. आधार नोंदणी न केल्यामुळे 2. शुल्क निश्चीती वेळेवर न झाल्यामुळे किंवा निकाल वेळेत न लागल्यामुळे) महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन फॉर्म भरुन सुध्दा मंजुर होऊ शकले नाहीत किंवा काही तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन फॉर्म भरु शकले नाहीत अशा सर्व विदयार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष **2018–19 ते 2023–24 या कालावधीतील शिष्यवृत्ती/फ्रीशीप करीताचे अर्ज ऑफलाइन पध्दतीने दिनांक 29/11/2024 पुर्वी भरुन संबंधीत कागदपत्रांची पुर्ततेसह सदरचे अर्ज महाविदयालयात समक्ष येऊन जमा करावयाचे आहेत.**

सदरचे अर्ज मा. सहायक आयुक्त समाजकल्याण, सातारा. यांचे कार्यालयास तपासुन विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरुन विहित मुदतीत सादर करावयाचे असल्याने दि. 29/11/2024 पर्यंतच केलेले अर्ज स्विकारले जातील याची संबंधित विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी. अर्ज विहीत मुदतीत व कागदपत्रांच्या पुर्ततेसह महाविदयालयास सादर न केल्यास शिष्यवृत्ती/फ्रीशीप प्राप्त न झालेस त्यास विदयार्थी जबाबदार राहील. याची सर्व विदयार्थ्यांनी नोंद घेऊन अर्ज विहीत मुदतीत व कागदपत्रांच्या पुर्ततेसह महाविदयालयास सादर करावेत.

14/11/24
(श्रीमती जयश्री सं. पाटील)
प्र. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कराड

प्रत – 1. सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यांत येते की, त्यांनी सर्व सबंधीत विदयार्थ्यांना कळवावे.
2. मुख्य सूचना फलक.
3. विभाग प्रमुख संगणक विभाग यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस